**महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-४२२ ००२.**
**रजि. ऑफीस** - " आदिवासी विकास भवन ", २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक-२
**दुरध्वनी** - (०२५३) २५७१७८२,२५७६८६०, फॅक्स- (०२५३) २५७१५६०.
Web-www.mahatdc.in, mail- msctdcnsk@gmail.com

जा. क्र.आविम/प्रशा/आस्था-२/ ४७९३ /२०१६
ना शि क : दिनांक : ०८ मार्च, २०१६

## संक्षीप्त विशेष सुचना

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, यांचे आस्थापनेवरील **विपणन निरिक्षक** या पदाच्या भरती प्रक्रिया महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ९ जुन, २०१४ चे अधिसुचनेनुसार गट-क मधील अदिवासी विकास निरिक्षक हे पद पुर्णत: स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरावयाचे आहे. त्यामुळे महामंडळातील विपणन निरिक्षकांची पदे पुर्णत: स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरावयाची असल्याचे जाहिरातीत नमुद आहे.

**विपणन निरिक्षक** संवर्गातील भरावयाची पदे मा.राज्यपाल महोदय, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना दिनांक ९ जुन, २०१४ नुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधुनच भरावयाचे असल्याने त्यासाठी उमेदवारांनी स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील आवश्यक पुरावे सादर करणे बंधनकारक राहील असे नमुद आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, यांचे आस्थापनेवरील **विपणन निरिक्षक** या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी घेतलेल्या लेखी परीक्षेतील उमेदवारांची गुणवत्ता तसेच ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील पत्त्यानुसार कागदपत्र पडताळणीच्या अधिन पात्र ठरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची अंतरीम निवड यादी व अंतरीम प्रतिक्षा यादी www.tribalexam.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**विपणन निरीक्षक** या पदाकरीता ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांनी दाखल केलेल्या निवेदनांवरुन उमेदवारांनी फॉर्म भरताना स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील मुळ पत्ता नमुद न करता पत्रव्यवहारासाठी अन्य पत्ता नमुद केलेला असल्याने सदर उमेदवार हे स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील (पेसा अंतर्गत) असुनसुध्दा अंतरिम निवड यादीमध्ये त्यांचा समावेश झालेला नाही.

मा. राज्यपाल महोदय, यांचे दि.०९ जुन, २०१४ च्या अधिसुचना व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीबीबसी-२०१४/प्र.क्र.२१३A/१४/१६-ब मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०५ मार्च, २०१५ नुसार अनुसूचित जमातीतील स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे.

- विपणन निरिक्षक या पदासाठी प्रसिध्द केलेल्या कट ऑफ गुणांच्या वरील सर्व उमेदवारांना स्थानिक अनुसूचित क्षेत्राचा निकषात बसतात किंवा नाही ही खात्री करण्यासाठी कागदपत्र पडताळणीकरीता प्राथमिक टप्प्यात पाचारण करण्यांत येत आहे.
- त्यानुसार मुळ कागदपत्र पडताळणीअंती जे उमेदवार हे स्थानिक अनुसूचित क्षेत्रात समावेश असल्याचे पुरावे सिध्द करतील अशा पात्र उमेदवारांचा गुणवत्तेच्या आधारे अंतरिम निवडसाठी विचार करण्यांत येईल.
- दि.०२ डिसेंबर, १९८५ च्या भारतीय राजपत्रानुसार उमेदवार हा स्थानिक वास्तव्याकरीता महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०९ जुन, २०१४ अन्वये स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील असल्याबाबत पुराव्या दाखल खालील कागदपत्रे सादर करतील.
  १. उमेदवाराचा मुळ जातीचा दाखला.
  २. उमेदवाराचे मुळ जात वैधता प्रमाणपत्र.
- सदर मुळ प्रमाणपत्राच्या आधारे दि.०२ डिसेंबर, १९८५ च्या भारतीय राजपत्रानुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०९ जुन, २०१४ चे अधिसुचनेनुसार उमेदवार स्थानिक अनुसूचित क्षेत्रात वास्तव्य करीत असल्याचे सिध्द झाल्यासच उमेदवाराचा निवड प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता विचार करण्यात येईल.

व्यवस्थापकीय संचालक
म.रा.सह.आदि.विकास महामंडळ मर्या.,
नाशिक करीता.

स्थळ प्रतिवर मा.व्य.सं.यांची सही असे.